# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते-मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १७६ वा रविवार दि.१० डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## महागाई, बेरोजगारी, शेतक-यांच्या प्रश्नावर काँग्रेस आक्रमक

नागपूर : महागाई, बेरोजगारी, शेतक-यांच्या प्रश्नावर काँग्रेस आक्रमक होताना पाहायला मिळत असून, नागपूर विधानभवनावर 'हल्लाबोल' मोर्चा काँग्रेसच्या वतीने काढण्यात येणार आहे. सोमवारी (११ डिसेंबर) रोजी विधानभवनावर हा मोर्चा धडकणार आहे. विदर्भातील नागरिकांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. 'खोकेबाज, धोकेबाज, चालबाज सरकारच्या विरोधात मोर्चा' अशी टॅगलाईन या मोर्चाला देण्यात आली आहे.राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आहेत, शेतमालाला भाव नाही, सरकार मदतीच्या कोरड्या घोषणा करत आहे, तरुणांना नोक-या नाहीत, आरक्षणावर निर्णय घेतला जात नाही. ड्रगमाफियांचा सुळसुळाट झाला आहे पण भाजपाप्रणीत शिंदे सरकार जनतेच्या या मूलभूत प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. जनतेला वा-यावर सोडून विदर्भात फक्त पर्यटनाला आलेल्या बेजबाबदार महाराष्ट्रविरोधी भाजपा व फुटीरांच्या सरकारला जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा भव्य 'हल्लाबोल' मोर्चा सोमवारी काढण्यात येणार असल्याचे काँग्रेसच्या वतीने सांगण्यात आले आहे.राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दोन




दिवसांच्या कामकाजात सरकारने शेतक-यांच्या प्रश्नांवर चर्चाही केली नाही. केवळ शेतक-यांना भरपूर दिले आहे अशा पोकळ घोषणा मुख्यमंत्री व त्यांचे मंत्री देत आहेत. अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सरकार शेतक-यांच्या बांधावर जाऊन फोटोसेशन करून आले पण अजून कोणतीही मदत जाहीर केलेली नाही. याआधीच्या नुकसानीची मदतही अजून शेतक-यांना मिळालेली नाही. पीकविम्याचे पैसेही मिळालेले नाहीत. राज्यातील कायदा-सुव्यवस्था ढासळलेली आहे. अपहरण, हत्या, महिला अत्याचारात महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक असल्याचे ठउफइ च्या अहवालातून स्पष्ट झाले आहे . पण गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र अहवाल कसा वाचायचा, याचे ज्ञान पाजळून मूळ मुद्याला बगल देत आहेत. राज्यात विविध खात्यांतील २.५ लाख पदे रिक्त आहेत पण सरकार नोकर भरती करत नाही. लाखो विद्यार्थी नोकरीची प्रतीक्षा करत आहेत पण सरकार परीक्षाही घेत नाही. सरकारच्या वेळकाढूपणामुळे लाखो मुलांची वयोमर्यादा निघून जात आहे, त्यामुळे या सर्व प्रश्नांसाठी काँग्रेस रस्त्यावर उतरणार आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील या मोर्चात विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, बसवराज पाटील, आ. प्रणिती शिंदे, आ. कुणाल पाटील, माजी मंत्री, आमदार, खासदार, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयूआय, विविध सेल व विभागाचे हजारो पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

## नेत्र विभागाचे डॉ. नंदकुमार डोळे यांचे सर्जरी पेशंट अल्ताफ पठाण यांनी पेढे भरून पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले.



लातूर:- लातूर येथील सुप्रसिद्ध, मनमिळाऊ स्वभावाचे, डॉ. नंदकुमार डोळे यांनी अल्ताफ पठाण या रुग्णांच्या डोळ्याला जखम झाली होती. त्या जखमेचे सर्जरी करून अतिशय चांगल्या प्रकारे दिसेल अशा पद्धतीने सर्जरी केले आहे. पैशाचे मोल नसते त्यांना दृष्टी आणून दिली. अल्ताफ पठाण यांनी अतिशय उत्साहाने आनंदाने डॉ. नंदकुमार डोळे यांचे पुष्पगुच्छ देऊन पेढे भरून त्यांचे तोंड गोड केले. यावेळी रुग्णाचे वडील हमीदखा पठाण यांनी सुद्धा पुष्पगुच्छ देऊन मन भरून कौतुक केले.

## खासदार दानिश अली यांची बसपातुन हकालपट्टी

लखनौ : बहुजन समाज पक्षाने खासदार दानिश अली यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. बसपाने दानिश अली यांच्यावर पक्षविरोधी कारवायांचा आरोप केला आहे. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सतीश चंद्र मिश्रा यांनी अमरोहाचे लोकसभा खासदार दानिश अली यांना पत्र लिहून त्यांना बसपच्या सदस्यत्वावरून तात्काळ निलंबित करण्यात आल्याची माहिती दिली आहे. मिश्रा यांनी पत्रात लिहिले आहे की, दानिश अली यांना पक्षाची धोरणे, विचारसरणी आणि शिस्तीच्या विरोधात जाणारे कोणतेही विधान करू नका असे तोंडी सांगण्यात आले होते, परंतु ते सतत पक्षाच्या विरोधात काम



करत आहेत.तसेच पत्रात दानिश अली यांना उद्देशून मिश्रा यांनी लिहिले आहे की, माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांच्या विनंतीवरून तुम्हाला अमरोहा येथून बसपाचे उमेदवार म्हणून तिकीट देण्यात आले होते. बसपाचे तिकीट मिळाल्यानंतर तुम्ही पक्षाची सर्व धोरणे आणि सूचनांचे पालन करून पक्षहितासाठी काम करू, असे आश्वासन देवेगौडा यांनी दिले होते. तुम्ही त्यांनाही याची पुनरावृत्ती केली होती, पण ते आश्वासन विसरून तुम्ही पक्षविरोधी कारवाया करत आहात.संसदेच्या विशेष अधिवेशनादरम्यान सप्टेंबर २०२३ मध्ये भाजप खासदार रमेश बिधुरी यांनी दानिश अली यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यानंतर अनेक प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्यांना पाठिंबा दिला. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती. दानिश अली यांनीही शुक्रवारी (८ डिसेंबर) संसदेबाहेर टीएमसी नेत्या महुआ मोईत्रा यांच्या बाजूने निदर्शने केली होती.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा लातूर दौरा

लातूर :- राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे रविवार, १० डिसेंबर, २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. ना. बनसोडे हे १० डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता लातूर येथील शकुंतला निवास येथून मोटारीने बसवेश्वर चौककडे प्रयाण करतील. दुपारी १२.३५ वाजता बसवेश्वर चौक कातपूर रोडवरील पार्वती मंगल कार्यालयात अनिल बनसोडे यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी ३.०० वाजता लातूर शहरातील एलआयसी कॉलनीतील रुद्रेश्वर मंदिर येथे ९१ व्या सत्संग सोहळानिमित्त श्री. शिवानंद हैबतपुरे यांची भव्य



बसव कथा सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी ३.३० वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. उदगीर तालुका क्रीडा संकुल येथे दुपारी ४.३० वाजता आयोजित राज्यस्तरीय शालेय डॉजबॉल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास ना. बनसोडे उपस्थित राहतील. सांयकाळी ५ वाजता उदगीर येथील मुसा नगर येथे सय्यद समद याकुब साहाब यांच्या मुलाच्या विवाह सोहळ्यानिमित्त सदिच्छा भेट देतील. सांयकाळी ५.३० वाजता उदगीर शहरातील बिदर रोडवरील बियाणी वेअरहाऊस येथील कैलाशचंद्र बियाणी यांच्या ५१ व्या लग्न वाढदिवस समारंभनिमित्त सदिच्छा भेट देतील.

## लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांना दैनिक महावृत्त दिवाळी अंक भेट



लातूर :- लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांना दैनिक महावृत्त दिवाळी अंक भेट देण्यात आले यावेळी दैनिक महावृत्तचे संपादक अशोक हनवते, उपस्थित होते

## दैनिक महावृत्त दीपावली विशेष अंक मनपाचे प्रमुख स्वच्छता निरीक्षक रमाकांत पिडगे यांना भेट



लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेचे प्रमुख स्वच्छता निरीक्षक रमाकांत पिडगे यांना दैनिक महावृत्त दीपावली विशेष अंक भेट देत असताना यावेळी अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त, लातूर शहर महानगरपालिका कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन धोंडीराम सोनवणे आदी उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### महुआ मोईत्रांवरची 'हकालपट्टी'ची कारवाई तकलादू ठरू शकते, ती का?

मुळात जे नियम नोंदीत ते मोडल्याचा आरोप, बाकीचे आरोपही मोघम ठरणारे कारण त्यांच्या पुष्ट्यर्थ काहीही नाही. कसून चौकशी न करताच कारवाईचा निर्णय, याचे पुढे काय होणार? – जॉन ब्रिटास या लेखाचा हेतू महुआ मोईत्रा यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांचे निष्पक्षपाती विश्लेषण करणे एवढाच आहे. त्यासाठी, आधी प्रत्येक आरोप आणि त्याचे परिणाम स्वतंत्रपणे पडताळून पाहाणे शहाणपणाचे ठरेल. पहिला आरोप म्हणजे महुआ मोईत्रा यांनी संसदेच्या 'ई–पोर्टल'वर त्यांना खासदार म्हणून मिळालेल्या खात्याचा लॉगइन तपशील (वापरकर्त्याचे नाव आणि मुख्य म्हणजे 'पासवर्ड' किंवा परवलीचा संकेतशब्द) गोपनीय न ठेवता दुसऱ्यांना दिला. हा एक जोरदार चर्चेचा मुद्दा आहे, कुणाही संसद सदस्याच्या सचोटीवर संशय घेण्यास हा आरोप पुरेसा आहे असेच प्रथमदर्शनी अनेकांना वाटू शकेल. परंतु या आरोपाच्या प्रतिवादाचे तर्क कोणीही नाकारू शकत नाही. मुळात जर 'खासदारांनी लॉगइन तपशील गोपनीयच ठेवावा आणि कोणालाही माहीत होऊच देऊ नये,' असा प्रतिबंध करणारे स्पष्ट नियम आणि कायदे असते तर हा मुद्दा ग्राह्य धरता आलाही असता. पण तशी कोणतीही नियमावली आपल्याकडे नाही. त्यामुळे या अशा आरोपावरून एखाद्याच खासदारावर राळ उडवणे हे आरोप करणाऱ्यांच्याच निवडक नैतिकतेचे लक्षण ठरते.आजघडीला बरेच खासदार, आपापले लॉगइन तपशील इतरांनाही सांगतात कारण असे करणे संसदीय जबाबदाऱ्यांच्या व्यावहारिक अंमलबजावणीसाठी सोपे पडते. संसदेच्या ई–पोर्टलवर प्रश्नांचा नेमका मसुदा तयार करण्यासाठी आणि अपलोड करण्यासाठी नियमितपणे व्यावसायिक मदतनिसांकडून काम करवून घेणारे खासदार अनेक आहेत, कारण काहीजणांना लॉगइन तपशील दिले की काम लवकर होते. त्यामुळे फार फार तर, महुआ मोइत्रा यांनी अविवेकी कृती केली म्हणून त्यांच्यावर निंदाव्यंजक कारवाई होऊ शकते. परंतु मग किती खासदार आपापले लॉगइन तपशील खरोखरच गोपनीय ठेवण्याची 'विवेकी कृती' करत असतात, हेही पाहावे लागेलच! त्याहीपेक्षा गंभीर मानला जाणारा आरोप असा आहे की, महुआ मोईत्रा यांनी दर्शन हिरानंदानी या कुणा व्यावसायिकाच्या सांगण्यावरून 'मोठ्या प्रमाणात पैसे आणि भेटवस्तू घेऊन' एका व्यावसायिक समूहाला लक्ष्य केले! या दाव्यातून सूचित होते ते असे की, विद्यमान सत्ताधाऱ्यांशी कथितपणे जवळीक असलेल्या व्यावसायिक समूहाच्या विरुद्ध प्रश्न उपस्थित केले गेले, तेही त्या उद्योगसमूहाच्या प्रतिस्पर्धी उद्योजकाकडून पैसे वा भेटवस्तू घेऊन. अशा आरोपांची वैधता ठरवण्यासाठी मुळात 'पैसे घेतले' किंवा 'महागड्या/संशयास्पद भेटवस्तू घेतल्या' हे तरी सिद्ध व्हावे लागेल की नाही? पण नाही. सुरुवातीला मोईत्रा यांच्यावर अत्यंत गंभीर आर्थिक आरोप करण्यात आले, त्यात हिरानंदानी यांच्याकडून मोईत्रांनी दोन कोटी रुपये रोख स्वीकारल्याचाही आरोप होता. पण या मोठ्या रकमेची देवाणघेवाण झाल्याचा आरोप अद्याप सिद्ध झालेलाच नाही, हा निष्कर्ष किमान प्रसारमाध्यमांतील बातम्यांवरून तरी काढता येतो. तरीही या आरोपाचा केवळ भेटवस्तूंशी संबंधित असणारा पैलू आहेच आणि भेटवस्तू मिळाल्या हे तर मोईत्रा यांनी स्वतः उघडपणे कबूल केले आहे. तेसुद्धा अगदी प्रत्येक भेटवस्तूच्या तपशीलवार वर्णनासह. तथापि, यापैकी कोणतीही भेटवस्तू महागडी वा प्रचंड किमतीची नाही. विशेष म्हणजे, हिरानंदानी यांनी समितीला उत्स्फुर्तपणे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात रोख रकमेचा कोणताही संदर्भच नाही. यामुळे एक प्रश्न निर्माण होतो: हिरानंदानी यांची चौकशी न करता, 'रोख आणि महागड्या भेटवस्तू' या आरोपाचा पुरावा ठरणारा तपशीलही कुठेच मिळालेला नसताना एका मोघम प्रतिज्ञापत्राच्या आधारे समिती निर्णायक निवाड्यावर कशी काय पोहोचू शकते? महत्त्वाचा भाग असा की, खासदारांनी प्रश्न उपस्थित करण्याची संसदीय प्रक्रिया ही अशीतशी नसते. संसद सचिवालयाने कठोर नियमांचे पालन करूनच एकेक प्रश्न काळजीपूर्वक निवडलेला असतो. या नियमांचे उल्लंघन करणारे प्रश्न सरळ टाकून दिले जातात. मग, इतक्या प्रक्रियेतून निवडला गेलेला एखादा प्रश्न 'कुटिल हेतूने प्रेरित' कसा काय मानता येईल? या कठोर प्रक्रियेतून संसदेत मांडले गेलेल्या प्रश्नांनाही अनेकदा अत्यंत सपक, मोघम उत्तरे मिळतात, असा अनुभव आहे. राज्यसभेत अनेकदा प्रस्तुत लेखकासह अनेक खासदारांनी विविध मंत्रालयांकडून समाधानकारक उत्तरे मिळविण्यासाठी अध्यक्षांच्या हस्तक्षेपाची मागणी वेळोवेळी करण्याची पाळी आलेली आहे. या संदर्भात, मोईत्रांवर माझा आरोप असा की त्यांनी उपलब्ध संधींचा पूर्ण उपयोगच केलेला नाही! पाहा ना : जवळपास पाच वर्षांच्या कार्यकाळात मोईत्रा यांनी अवघे ६१ प्रश्नच उपस्थित केले आहेत. मी गेली अडीच वर्षेच राज्यसभेत आहे, तरी मीसुद्धा २८५ प्रश्न उपस्थित केले आहेत.मोईत्रा यांची लोकसभेतून हकालपट्टी करण्याची शिफारस पहिल्यांदा केली ती संसदेच्या 'नीतिमत्ता समिती'ने. या समितीची जी काही बैठक ९ नोव्हेंबर रोजी काही मिनिटांपुरती झाली, त्यात हे ठरले. हिरानंदानी यांना मोईत्रांनी संसदेच्या ई–पोर्टलचा लॉगइन तपशील पुरवल्याबद्दल 'अनैतिक आचरण', 'विशेषाधिकारांचा भंग' आणि 'सभागृहाचा अवमान' केल्याबद्दल या नीतिमत्ता समितीने मोईत्रा यांच्यासाठी ही शिक्षा सुचवली. पण याच समितीने, लॉगइन तपशील पुरवल्याच्या आरोपाची संस्थात्मक चौकशी करण्याची शिफारसही केली होती, शिवाय 'भेटवस्तू आणि पैसे मिळाले' या आरोपाचीही आणखी चौकशी करण्याची शिफारस याच समितीने केली होती, त्याचे काय झाले? मुळात या समितीमध्येच, विरोधी पक्षांच्या चार सदस्यांनी सर्व शिफारशींना 'पूर्वग्रहदूषित' म्हणून नाकारले होते. या चौघा सदस्यांनी समितीपुढे असा आग्रह धरला होता की, हिरानंदानी यांनाही या चौकशीला हजर राहण्यासाठी बोलावले पाहिजे. या आक्षेपांचा आणि समितीच्या निष्कर्षांचा खरेपणा अद्यापही सिद्धा झालेला नाही. त्यामुळे आपल्या कारवाईचे 'न्यायिक पुनरावलोकन' झाल्यास, म्हणजे मोईत्रांवरील कारवाईच्या विरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्यास ही कारवाई टिकेल का, अशा अर्थाची शंकासुद्धा या खासदारांनी उपस्थित केलेली होती. मात्र मोईत्रा यांच्याविरुद्ध राजकीयदृष्ट्या वातावरण तापवले जात होते. काहीही आधार नसताना, मोईत्रा यांची सीबीआय चौकशी सुरू असल्याचा दावा सरकारच्या जवळच्या लोकांनी माध्यमांतून केला होता. हे सर्व खरे असेल, तर समिती किंवा लोकसभेने निष्कर्षापर्यंत पोहोचणे हे किती तकलादू आहे पाहा.

# तेलंगणातील 'सूर्योदय'

तेलंगणामध्ये भारत राष्ट्र समिती पक्षाचे अध्यक्ष केसीआर राव यांची विजयाची हॅट्रिक चुकवण्यामध्ये काँग्रेस पक्षाला यश आले आणि दक्षिणेतील एक महत्त्वाचे राज्य पक्षाच्या भात्यात दाखल झाले. वास्तविक हा काँग्रेसचा विजय नसून बीआरएसचा पराभव असल्याचे काहींचे म्हणणे आहे. कारण केसीआर रावांच्या एकाधिकारशाहीला, घराणेशाहीला जनता कंटाळली होती. परंतु या उणिवा समर्पकपणे मांडून जनतेला नव्या आशा दाखवण्याचे प्रभावी काम नवोदित मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी केले. यासाठी अपार मेहनतही घेतली. रेवंत या संस्कृत शब्दाचा अर्थ सूर्यपुत्र असा होतो. रेड्डींच्या प्रयत्नांमुळेच काँग्रेसचा सूर्य तेलंगणात उगवला आहे. तथापि त्यांच्यापुढे अनेक आव्हानेही असणार आहेत. काँग्रेसचा आश्वासक चेहरा म्हणून लोकप्रिय झालेले रेवंत रेड्डी हे तेलंगणाचे नवोदित मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले आहेत. निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत रेवंत रेड्डी आघाडीवर होते. त्यामुळे काँग्रेस हायकमांडने त्यांच्या नावाला मंजुरी दिली. रेवंत रेड्डी यांनी विद्यार्थीदशेतच राजकारणाला सुरुवात केली. भाजपच्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. पदवीनंतर ते चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम् पक्षात सामील झाले. २००९ मध्ये त्यांनी अविभाजित आंध्र प्रदेशच्या कोडंगल मतदारसंघातून विधानसभा निवडणूक जिंकली. पुढे तेलंगणा हे स्वतंत्र राज्य बनल्यानंतर २०१४ मध्ये ते पुन्हा टीडीपीच्या तिकिटावर आमदार झाले. २०१५ मध्ये त्यांना कॅश फॉर व्होट प्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्यांचे वर्णन चंद्राबाबू नायडूंचे एजंट असे करण्यात आले होते. विधान परिषद निवडणुकीत टीडीपीच्या बाजूने मतदान करण्यासाठी एका आमदाराला लाच देण्याचा प्रयत्न कॅमे–यात पकडल्यानंतर त्यांना हैदराबादच्या तुरुंगात पाठवण्यात आले. रेवंत यांनी २०१७ साली काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. काँग्रेसमध्ये त्यांची सुरुवात चांगली झाली नाही. कारण २०१८ च्या तेलंगणा विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभूत व्हावे लागले होते. विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर काँग्रेसने त्यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मलकानगिरीतून तिकिट दिले. त्यामध्ये ते केवळ दहा हजार मतांनी विजयी झाले. २०२१ मध्ये काँग्रेसने त्यांना प्रदेशाध्यक्ष केले. प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत ते काँग्रेसचे पोस्टर बॉय बनले. आताच्या तेलंगणाच्या विजयात त्यांचा मोलाचा वाटा असल्याचे काही निरीक्षकांचे म्हणणे आहे. वास्तविक, तेलंगणातील काँग्रेसचा विजय हे चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील भ्रष्ट आणि घराणेशाही सरकारच्या विरोधातील जनतेचे बंड मानले पाहिजे. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी वर्षानुवर्षे सुरू असलेली डाव्या सरकारची सत्ता उलथवून टाकली तेव्हा पश्चिम बंगालच्या लोकांनी २०११ मध्ये डाव्या सरकारच्या विरोधात केलेल्या सार्वजनिक विद्रोहासारखाच प्रकार तेलंगणात दिसून आला.

के. चंद्रशेखर राव हेही यापूर्वी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी राज्य सरकारमधील सत्ता आपल्या कुटुंबाच्या हातात ठेवली. त्यांच्यावर भ्रष्टाचार आणि घोटाळे यांचे अनेक आरोप झालेले आहेत. त्यामुळे या राज्यातील जनतेला सरंजामशाहीपासून स्वातंत्र्य हवे होते. त्याचा थेट फायदा काँग्रेसला झाला. त्यामुळे या विजयाचे श्रेय राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील 'भारत जोडो यात्रे'ला आणि रेवंत रेड्डी यांच्या भूमिकेला देता येणार नाही. तेलंगणात काँग्रेसचा विजय झाला नसून बीआरएसचा पराभव झाला आहे, असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. तेलंगणात भाजपचा प्रभाव नाही, त्यामुळे लोकांनी बीआरएसच्या विरोधात मतदान करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांच्यासमोर काँग्रेस हा एकमेव पर्याय होता. अर्थात राजकारणामध्ये विरोधकांचे कच्चे दुवे, त्यांच्या धोरणात्मक चुका, उणिवा, कामगिरीतील फोलपणा यांचा प्रभावीपणाने प्रचार करून त्या जनतेच्या निदर्शनास




आणून देणे गरजेचे असते. अन्यथा, कमजोर विरोधकांमुळे कुचकामी सरकारेही पुन्हा सत्तेवर विराजमान होतात. भारतीय लोकशाहीने अशी उदाहरणे पाहिली आहेत. त्यादृष्टीने विचार करता रेवंत रेड्डी यांची भूमिका या विजयामध्ये महत्त्वाची राहिली हे नाकारता येणार नाही. रेवंत रेड्डी हे माजी केंद्रीय मंत्री जयपाल रेड्डी यांची भाची गीताच्या प्रेमात पडले आणि त्यानंतर १९९२ मध्ये त्यांचे लग्न झाले. त्यांना एक मुलगी नैमिषा रेड्डी आहे. काही महिन्यांपूर्वी नातवाचाही जन्म झाला. तथापि, रेवंत रेड्डी यांनी आपले संपूर्ण लक्ष पक्ष आणि राज्याच्या मुद्यांवर असेल, ही बाब प्रचारसभांमधून सातत्याने मांडली. ते बांधकाम क्षेत्राशी संबंधित असल्याने आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत. रेवंत रेड्डी सुरुवातीपासूनच जोरदार युक्तिवाद करत होते की, दोन टर्म सरकारचे नेतृत्व करणा–या बीआरएस पक्षाने अनेक घोटाळे केले आहेत. बीआरएस सरकारला प्रश्न विचारण्यात आणि त्यांना समान पातळीवर उत्तरे देण्यात रेवंत यशस्वी झाले. काँग्रेस पक्ष अंतर्गत कलहासाठी ओळखला जात असला, तरी केवळ रेवंत रेड्डीच पक्षाला कोणत्याही मतभेदाशिवाय चालवू शकले, असे ठामपणे मानले जाते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, विकास आणि कल्याण हे आपले उद्दिष्ट असल्याचे रेवंत यांनी जनतेच्या मनावर बिंबवले.भारत राष्ट्र समितीचे प्रमुख आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर राव यांनी देशभरातील माध्यमांमधून प्रचंड जाहिरातबाजी करून या राज्याच्या विकासाचा ढोल पिटला असला तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. तेलंगणाची निर्मिती झाली तेव्हा या राज्याच्या तिजोरीत ७००० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल होता. आजची परिस्थिती पाहिल्यास या राज्यावर तितक्याच रकमेचे कर्ज असल्याचे दिसते. अशा स्थितीत रावांची अर्थनीती प्रभावी कशी म्हणता येईल? स्वतंत्र तेलंगणा राज्याच्या चळवळीची तीन प्रमुख कारणे होती– रोजगार, पाणी आणि आर्थिक स्थैर्य. केसीआर सरकार तरुणांना नोक–या देण्यात अपयशी ठरले. त्यांनी त्यांचा मुलगा केटीआर, मुलगी कविता आणि नातेवाईक हरिश राव आणि संतोष राव यांच्याभोवती सत्ता केंद्रित केली होती. यामुळेच त्यांना अनेक लोककल्याणकारी योजनांचा लाभ मिळाला नाही. केसीआर यांनी समाजातील विविध घटकांसाठी रयतु बंधू आणि दलित बंधू यांसारख्या अनेक योजना सुरू केल्या असल्या, तरी त्याचा लाभ गरजू लोकांना मिळू शकला नाही. शेतकरी, तरुण आणि आदिवासी सरकारवर नाराज होते. ही नाराजी मतपेटीतून दिसून आली.आता नवोदित मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारसमोर मोठी आव्हाने आहेत. नवीन सरकारला तरुण, शेतकरी आणि समाजातील विविध घटकांना प्राधान्य द्यावे लागणार आहे. पुढील वर्षी लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे नव्या काँग्रेस सरकारला जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी वेगाने काम करावे लागणार आहे. काँग्रेसने तेलंगणात सरकार स्थापन केल्यास प्रत्येक बेरोजगार तरुणाला दरमहा ४ हजार रुपये, महिलांना २,५०० रुपये, वृद्धांना ४,००० रुपये दरमहा पेन्शन आणि शेतक–यांना वर्षाला १५ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. तेलंगणातील जनतेला काँग्रेसने दिलेल्या हमीभावाबाबत रेवंत रेड्डी म्हणाले होते, कल्याणकारी मॉडेल आणि विकास मॉडेल हे काँग्रेस सरकारचे दोन डोळे आहेत. सक्षम लोकांना संधी देणे, जे अवलंबून आहेत त्यांना पाठिंबा देणे हे आमचे धोरण आहे. आता दिलेली आश्वासने पूर्ण करतानाच या राज्याला आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्याचे मोठे आव्हान रेड्डींपुढे आहे. काँग्रेसचे नवे सरकार भ्रष्टाचारमुक्त सरकार कसे चालवते, हीही मोठी लिटमस टेस्ट आहे. रेवंत रेड्डी हे काँग्रेसमधील कनिष्ठ नेते आहेत. त्यांना मुख्यमंत्री करण्यास काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांनी विरोध केला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता रेवंत रेड्डी पक्षाच्या नेत्यांना कितपत सोबत घेतात हे येत्या काळात पाहावे लागेल.

**************

–राजीव मुळ्ये,
ज्येष्ठ पत्रकार

# 'प्रेरणा'दायी पाऊल

यंदाच्या नौदल दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाने पहिल्यांदाच आपल्या युद्धनौकेवर स्त्री कमांडिंग ऑफिसरची नेमणूक केली. महाराष्ट्राच्या कमांडर प्रेरणा देवस्थळी असे या पहिल्यावहिल्या महिला कमांडिंग ऑफिसरचे नाव आहे. त्या सध्या आयएनएस चेन्नई या युद्धनौकेवर फर्स्ट लेफ्टनंट म्हणून कर्तव्य बजावत आहेत. मूळच्या मुंबईच्या असलेल्या प्रेरणा यांनी २००९ मध्ये नौदलात प्रवेश केला होता. त्यांची नियुक्ती 'आयएनएस त्रिंकट'च्या कमांडिंग ऑफिसर म्हणून करण्यात आली आहे. अलीकडील काळात नवनवीन प्रयोगांनी भारतीय नौदल नवीन उंची गाठत आहे. यंदा एक हजार 'अग्निवीर महिला सैनिक' नौदलात सामील झाल्या आहेत. महिला सक्षमीकरणात भारताने टाकलेले हे पाऊल परिवर्तनकारी ठरेल यात शंका नाही.कोकणातील सिंधुदुर्गमध्ये पार पडलेला यंदाचा भारतीय नौदल दिन अनेकार्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरला. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. त्यानुसार आता नौदलाच्या गणवेशावर छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा असणार आहे आणि नौदलाच्या पदांना भारतीय पद्धतीची नावं देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना पंतप्रधानांनी सशस्त्र दलांमध्ये नारीशक्ती वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. भारतीय संरक्षण विभागाच्या तिन्ही दलांत आता पुरुषांप्रमाणेच महिलांनाही संधी देण्यात येत आहे. जात, पंथ, धर्म आणि लिंग यांमधील फरक विसरून सगळ्यांना समान संधी देण्याचे भारतीय सशस्त्र दलाचे उद्दिष्ट आहे. याच उद्दिष्टाला अनुसरून भारतीय नौदलाच्या युद्धनौकेवर पहिल्यांदाच एका महिला अधिका–याची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रेरणा देवस्थळी असे या महिला अधिका–याचे नाव आहे. आयएनएस त्रिंकट या भारतीय युद्धनौकेच्या नेतृत्वपदी त्यांना नियुक्त करण्यात आले आहे. यापूर्वी कॅप्टन देवस्थळी या आयएनएस चेन्नई या युद्धनौकेवर तैनात होत्या. त्या मूळच्या मुंबई येथील असून त्यांनी सेंट झेवियर्स कॉलेजमधून मानसशास्त्रात पदवी मिळवली आहे. त्यांचा भाऊ देखील भारतीय नौदलात अधिकारी म्हणून कार्यरत आहे. प्रेरणा या टीयू–१४२ वरील पहिल्या महिला निरीक्षक आहेत. आयएनएस त्रिंकट ही युद्धनौका पश्चिम नौदल कमांडचा भाग आहे.ती प्रामुख्याने गस्त घालणारी युद्धनौका आहे. या युद्धनौकेच्या माध्यमातून मच्छिमारांना संरक्षण दिले जात आहे. घुसखोरी करणा–याविरोधात कारवाई करणे, शोध आणि बचाव मोहिमेत महत्त्वाची जबाबदारी पार पाडणे या उद्देशाने ही युद्धनौका काम करते. ही युद्धनौका ४६ मीटर लांबीची असून तिचे वजन २६० टन आहे. ताशी ५६ किलोमीटर वेगाने धावणारी त्रिंकट युद्धनौका चार किलोमीटरपर्यंत मारा करणा–या ३० मिमी तोफने सज्ज आहे. प्रेरणा या उत्तम नॅव्हिगेशन इन्स्ट्रक्टर आहेत. तसेच नौदलाच्या 'तोपुलेव्ह तू–१४२' या समुद्री टेहळणी विमानाच्या निरीक्षक म्हणूनही त्यांनी काम



केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सैन्यदलांमध्ये सामील होऊ इच्छिणा–या तरुणींचे मनोबल उंचावण्यास निश्चितच मदत होणार आहे. त्यांच्यासाठी प्रेरणा या आयडॉल ठरतील यात शंका नाही. भारताच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी देशातील जवान तिन्ही सैन्य दलांत तैनात आहेत. या जवानांमध्ये देशाच्या सुरक्षेत योगदान देणा–या महिलांचाही समावेश आहे. भारतीय नौदलात अनेक शक्तिशाली महिला अधिकारी कार्यरत आहेत आणि आपल्या धाडसाने या महिला अधिका–यांनी नौदलात मोठी पदे मिळवून इतिहास रचला आहे.भारतीय नौदलात २०२० मध्ये दोन महिला अधिकारी तैनात करण्यात आल्या होत्या. भारतीय नौदलाच्या इतिहासात प्रथमच नौदलाच्या युद्धनौकांमध्ये या दोन महिला अधिका–यांना महत्त्वाची पदे मिळाली होती. यापैकी एक होत्या कुमुदिनी त्यागी आणि दुस–या रीती सिंग. त्यांची हेलिकॉप्टर प्रवाहात 'निरीक्षक' (हवाई रणनीतीज्ञ) म्हणून निवड करण्यात आली. त्या देशातील पहिल्या महिला एअरबोर्न टॅक्टिशियन्स म्हणून ओळखल्या जातात. उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या कुमुदिनी त्यागी यांनी दहावीच्या परीक्षेपासून सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचे वडील सुरक्षा एजन्सी चालवतात आणि आजोबा सुरेशचंद त्यागी पोलिसांत उपनिरीक्षक होते. कुमुदिनी यांनी बी. टेक केल्यानंतर सैन्यात भरती होण्याची तयारी सुरू केली. अहोरात्र मेहनत केल्यानंतर त्या नौदलात दाखल होऊ शकल्या. कुमुदिनी यांना डिसेंबर २०१८ मध्ये कमिशन मिळाले. सब लेफ्टनंट रीती सिंग या लष्करी कुटुंबातून आलेल्या आहेत. त्यांच्या कुटुंबातील तीन पिढ्या सैन्यात कार्यरत आहेत. रीती यांचे वडील एस. के. सिंग हे भारतीय नौदलातून निवृत्त झाले आहेत. त्याची आई इंग्रजी शिक्षिका आहे.आज केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सैन्यात, विशेषत: नौदलात महिलांसाठी संधी सतत वाढत आहेत. अनेक सशस्त्र दले एकेकाळी महिलांना समर्थन आणि प्रशासकीय भूमिका सोपवण्यापुरती मर्यादित भूमिका घेत होती. परंतु आता महिला या क्षेत्रात निर्णयप्रक्रियेतील सर्वोच्च स्थानापर्यंत पोहोचत आहेत. अमेरिकेमध्ये २०२२ च्या पाहणीनुसार, प्रत्येक सहा सक्रिय–कर्तव्य सेवा सदस्यांपैकी एक महिला आहे. या जागतिक बदलातील एक महत्त्वाचा क्षण २१ जुलै रोजी आला जेव्हा अध्यक्ष जो बायडेन यांनी ॲडमिरल लिसा फ्रँचेट्टी यांची अमेरिकन नौदलप्रमुख म्हणून नियुक्ती केली. यासाठीचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून त्या नौदलात दाखल झाल्या. चार वर्षांपूर्वी सब लेफ्टनंट शिवांगी यांनी नौदलातील पहिल्या महिला वैमानिक होण्याचा बहुमान पटकावला. भारतीय वायुदलात अनेक शक्तिशाली लढाऊ विमानांचा समावेश आहे. ही विमाने चालवण्यासाठी नौदलात अनेक दिग्गज वैमानिक आहेत. शिवांगी सिंग या त्यापैकीच एक आहेत. शिवांगी या पहिल्या महिला वैमानिक आहेत ज्यांनी राफेलसारखे शक्तिशाली लढाऊ विमान चालवले. शिवांगी सिंग या उत्तर प्रदेशातील वाराणसी जिल्ह्यातील रहिवासी आहेत. शिवांगी यांचे आजोबा व्ही. एन. सिंह सैन्यात कर्नल होते.शिवांगी यांचे लहानपणापासूनच लढाऊ विमान उडवण्याचे स्वप्न होते. २०१७ मध्ये देशाच्या पाच महिला लढाऊ विमान वैमानिकांच्या टीममध्ये त्यांची निवड करण्यात आली. शिवांगी यांनी मिग २१ देखील उडवले आहे.

भारताचा विचार करता आपल्याकडे फेब्रुवारी २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महिलांना थेट सैन्यात भरती होण्यास, वरिष्ठ पदे, कायमस्वरूपी कमिशन आणि लढाऊ भूमिकांमध्ये प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. सध्या भारतीय सैन्यात विविध पदांवर ७,०९३ महिला आहेत. नौदलात ७४८ महिला अधिकारी आहेत (वैद्यकीय आणि दंत अधिका–यांसह) आणि हवाई दलात वैद्यकीय आणि दंत शाखा वगळता १,६३६ महिला अधिकारी आहेत. अर्थात, आंतरराष्ट्रीय स्तरावर, कॅनडा, फ्रान्स आणि जर्मनी यांसारख्या देशांच्या सशस्त्र दलांमध्ये महिलांची टक्केवारी जास्त आहे. लष्करातील महिला त्यांच्या पुरुष समकक्षांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या आहेत आणि त्यांनी लष्करी सन्मान, तारे, पट्टे आणि पदकांचे समान हक्क मिळवले आहेत. २०१६ मध्ये ब्राझीलने महिलांना लढाऊ प्रशिक्षण घेण्याची परवानगी दिली. युनायटेड अरब अमिरातीने गेल्या वर्षी सीरियामध्ये इस्लामिक स्टेटविरुद्धच्या मोहिमेत महिला लढाऊ पायलटला सहभागी होण्याची परवानगी देऊन एक मोठे पाऊल टाकले होते. दक्षिण कोरियाने तर १९९० च्या दशकातच महिला लढाऊ पायलटना अधिमान्यता दिली होती. भारतीय सशस्त्र दलांमध्येही येत्या काळामध्ये महिलांच्या कर्तृत्वाच्या अनेक कहाण्या जगासमोर आदर्श ठरणा–या असतील. आज आपल्या नौदलाचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात कौतुक होत आहे.

******************

– कॅप्टन निलेश गायकवाड

# मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत लढाई सुरूच राहणार

जळकोट : ओमकार सोनटक्के राज्यातील मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळालेच पाहिजे, ओबीसी आरक्षणामुळे व्यक्ती गरीब असो की श्रीमंत त्यांच्या मुलाला फायदा होणार आहे. समाजातील मुलांना एक टक्के गुण कमी मिळाले तर त्यांची नोकरी हुकत आहे. जन्मभर बेकार राहण्याची वेळ येत आहे, यामुळे आता आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसता कामा नये. या आरक्षणाच्या लढाईमध्ये गोरगरीब, श्रीमंत, महिला आणि पुरुष या सर्वांनी सामील झाले पाहिजे. आज या आरक्षण लढाईमुळे राज्यभरातील ३५ लाख मराठ्यांना आरक्षणाचा लाभ मिळालेला आहे. हा एक या लढाईचा विजयच आहे, परंतु एवढ्यावर न थांबता राज्यभरातील सर्व मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत ही लढाई चालूच ठेवणार असल्याचा निर्धार मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केला .जळकोट तालुका व जांब (बु) यांच्या संयुक्त विद्यमाने जांब बु. येथे मराठा आरक्षण लढाईचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते उपस्थित सकल मराठा समाजातील बांधवांना मार्गदर्शन करत होते. मनोज जरांगे पाटील यांचे सभास्थळी आगमन होताच त्यांच्यावर तब्बल २५ जेसीबी द्वारे पुष्प वृष्टी करण्यात आली. याप्रसंगी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, या आरक्षणाच्या लढाईमुळे सरकार आता मराठा समाजाला आरक्षण देणार आहे. आरक्षणाची लढाई आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून ८० टक्के आरक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे.राज्यभरामध्ये सर्व जिल्ह्यांमध्ये कुणबीच्या नोंदी सापडलेल्या आहेत परंतु लातूर, नांदेड आणि संभाजीनगर या तीन जिल्ह्यांमध्ये नोंदी अतिशय कमी सापडत आहेत. या ठिकाणी देखील अधिका-यांनी कागदपत्राची योग्य तपासणी करून नोंदी शासनाला पुरवणे गरजेचे आहे. जो कोणी जाणून बुजून नोंदी लपवत असेल त्यांना या प्रक्रियेमध्ये ठेवू नका असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला. तसेच काही व्यक्ती जाती जातीत तेढ निर्माण व्हावा म्हणून कोयत्या कु-हाडीची भाषा बोलत आहेत. परंतु त्या व्यक्तींना आपल्याला आज काहीच बोलायचे नाही. आरक्षणा मिळे पर्यंत शांत रहा आरक्षण निघाल्यावर पुढचे बघू असा देखील इशारा त्यांनी अप्रत्यक्षपणे मराठा आरक्षणाला विरोध करणा-याना दिला.शासनाने सकल मराठा समाजाला २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण देणार असल्याचे सांगितले आहे जर २४ डिसेंबर पर्यंत मराठा समाजाला आरक्षण नाही मिळाले तर सरकारला याची गंभीर परिणाम भोगावे लागतील. असे सांगून पुढे देखील आपले आंदोलन तीव्र करावे लागेल परंतु हे आंदोलन शांततेमध्ये सर्वांना करायचे आहे. शांततेमुळे आज आरक्षण



मिळत आहे जर सरकारने २४ डिसेंबर पर्यंत आरक्षण नाही दिले तर सर्वांनी तयारीला लागा गावा गावामध्ये बैठका घ्या, महिला पुरुष असा भेदभाव न करता खांद्याला खांदा लावून लढाईला तयार राहा, पुढचे आंदोलन अतिशय ताकदीने लढावे लागणार आहे. देशातील सर्वात मोठी जात ही मराठा आहे, आम्ही शेती करणारे आहोत कुणबी आहोत यामुळे आरक्षण घेण्यासाठी लाजू नका असे आव्हान देखील त्यांनी उपस्थित सकल मराठा समाजाच्या नागरिकांना केले . तसेच शांततेच्या मार्गाने आंदोलन करा उद्रेक करू नका व मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करू नका असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. मला मरण जरी आलं तरी चालेल परंतु तुम्हाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही व मागे हटणार नाही असे देखील यावेळी त्यांनी सांगितले.या सभेचे सूत्रसंचालन मारुती बुद्रुक पाटील यांनी केले तर या सभेच्या ठिकाणी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख, पोलीस निरीक्षक रमेश वाघ, पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला, सहायक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके, पोलीस उपनिरीक्षक मुस्तफा परकोटे यांनी बंदोबस्त ठेवला होता. तसेच याप्रसंगी शेकडो पोलिसांची देखील उपस्थिती होती. या सभेच्या यशस्वीतेसाठी जळकोट तालुका तसेच जांब येथील सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले या सभेतील उपस्थित नागरिकांना अल्पोपहार तसेच पाण्याची व्यवस्था अनेक सामाजिक संघटना कडून करण्यात आली होती.

# मानसिक आघाताची लक्षणे कोणती? तो कसा ओळखावा?

अचानक आणि अनपेक्षितपणे घडलेल्या घटनांचे आघात अनेकदा दीर्घकाळ राहतात. कधी भीती वाटते तर कधी शारीरिक अक्षमताही येते. हे आघात व त्याच्याशी संबंधित विकार कसे ओळखावेत आणि त्यावर उपचार कसे करणार? डॉ. रश्मी जोशी शेट्टी इस्रायल आणि हमास यांच्यामध्ये सध्या सुरू असलेल्या भीषण युद्धाच्या बातम्या हादरून टाकणाऱ्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये टिपण्यात आलेली दृश्ये हेलावणारी आहेत. अकस्मात झालेल्या हल्ल्यांमध्ये धारातिर्थी पडणारे नागरिक, भल्यामोठ्या इमारती मिसाइलच्या एका तडाख्यात जमिनदोस्त होतानाची दृश्ये, लहान निरागस मुलांना जीवे मारून जाळल्याचे व्हिडीओ, जनसामान्यांचा हृदय पिळवटून टाकणारा आक्रोश हे सगळे मानवतेला काळीमा फासणारे तर आहेच पण या शिवाय या सर्व घटनांचे दूरगामी परिणाम मनावर होणारे आहेत.कुठल्याही प्रकारचा ट्रॉमा किंवा आघात होऊन किंवा कुठून तरी अशा आघातांच ज्ञान झाल्यानंतर जी मानसिक लक्षणं निर्माण होतात त्याला पोस्ट ट्रॉमॅटीक स्ट्रेस डिसऑर्डर (झढडऊ) असे म्हणतात. ही आपत्ती नैसर्गिक (भूकंप, त्सुनामी असो वा प्रेमाच्या माणसाला अचानक गमावणे असो) असो किंवा मानवी कृत्ये (जातीय दंगली, गर्दी किंवा अचानक धोक्याची सूचना आल्यावर होणारी चेंगराचेंगरी, बलात्कार आदी) अशा घटनांमध्ये ही लक्षणे पाहायला मिळतात. मन तर मनंच असतं, त्यावर होणारे आघात खोलवर अंतर्मनात जाऊन बसतात.कोविड महासाथीनंतर आयसीयूतून बाहेर आलेले आपल्या वडिलांचे शव आणतांना इतर अनेक मृतदेह पाहिले आणि आता अगदी रात्रीसुद्धा मला तशीच स्वप्ने येतात आणि दचकून जाग येऊन मी सैरभैर घरात पळतो असं क्लिनिकमध्ये आलेल्या एका विकारग्रस्तानं सांगितलं, हे झढडऊ चंच लक्षण आहे. ही लक्षणे अशा विध्वंसक घटनेनंतर लगेचच किंवा एक ते दोन आठवड्यात सुरू होतात आणि एक ते सहा महिने किंवा त्यापेक्षा ही जास्त काळ राहू शकतात. अशा घटनांनंतर १०० पैकी ७-८ जणांना झढडऊ चा अनुभव येतो.

# पुण्याची पसंत मोरे वसंत

पुणे : पुण्याचे दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर पुणे लोकसभेची जागा रिक्त आहे. या जागेवर पोटनिवडणूक का घेतली नाही? यासाठी न्यायालयाने निवडणूक आयोगाला झापले देखील आहे. मात्र आता पोटनिवडणुकीचा कालावधी निघून गेल्यानंतर लोकसभा निवडणुकीचं वारं पुण्यात वाहायला सुरुवात झाली आहे. एकीकडे भाजप, काँग्रेसकडून लोकसभेसाठी इच्छुक नेत्यांची बॅनर पाहायला मिळत आहेत. दुसरीकडे मनसेने देखील पुणे लोकसभेची तयारी सुरू केली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात मनसे नेते वसंत मोरे यांची बॅनरबाजी सुरू झाली आहे.पुणे मनसेचे माजी शहराध्यक्ष आणि माजी नगरसेवक वसंत मोरे हे पुढील लोकसभेसाठी इच्छुक आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ते त्या पद्धतीने इच्छा देखील व्यक्त करत आहेत. पुणे शहराच्या उपनगर भागामध्ये वसंत मोरे यांचे यापूर्वी भावी खासदार असे बॅनर लावण्यात आले होते. मात्र आता पुणे शहराचा मध्यवर्ती भाग असलेल्या कसबा विधानसभा मतदारसंघात देखील वसंत मोरे यांचे बॅनर लावण्यात आले आहेत. मनसेचे कसबा विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष गणेश भोकरे




यांनी हे बॅनर लावले आहेत. ‘पुण्याची पसंत मोरे वसंत, पुणे शहर लोकसभेसाठी सक्षम नेतृत्व कार्यसम्राट नगरसेवक वसंत मोरे’. अशा आशयाचे बॅनर पुण्यातील मध्यवर्ती भागात लावण्यात आले आहेत.मनसेकडून पुणे लोकसभा मतदारसंघाचे प्रभारी म्हणून अमित ठाकरे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्याच अनुषंगाने अमित ठाकरे आज पुण्यातील विभाग अध्यक्षांची एक बैठक घेत आहेत. या बैठकीत वसंत मोरे यांच्या नावावर चर्चा होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे कार्यकर्ते वसंत मोरे यांच्या नावाला आजच्या बैठकीत पसंती देणार असल्याची माहिती मिळत आहे.

# इरिटेबल बॉवेल सिंड्रोम म्हणजे काय? या आजारात कॉफी कशी ठरतेय फायदेशीर, वाचा


इरिटेबल बॉवेल सिंड्रोम म्हणजे काय? महिलांना याचा जास्त त्रास का होतो? वाचा इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (खइड) हा एक सामान्य विकार आहे, जो मोठ्या आतड्याला प्रभावित करतो. महिलांना फारसं याबद्दल माहिती नसेल, मात्र हा विकार सामान्यत: जास्त प्रमाणात महिलांमध्ये आढळतो. इरिटेबल बॉवेल सिंड्रोम म्हणजे काय? तर, पोटाच्या आजारांपैकी आढळणारा आजार म्हणजे ‘इरिटेबल बॉवेल सिंड्रोम’. आयबीएस ही एक जुनाट स्थिती आहे, जी तुम्हाला दीर्घकाळ जाणवू शकते. आयबीएस असणाऱ्या काही लोकांमध्येच गंभीर चिन्हे आणि लक्षणे असतात. मात्र, नवीन अभ्यासात नियमितपणे कॉफी प्यायल्याने महिलांना इरिटेबल बोवेल सिंड्रोम टाळता येण्याची शक्यता आहे. गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. मनोज गुप्ता यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना यासंदर्भात अधिक माहिती दिली आहे.डॉ. मनोज गुप्ता यांच्या मते, कॉफीमुळे आपल्या आतड्यांना आराम मिळतो. तसेच पचनास मदत आणि आतडे स्वच्छ ठेवण्यास मदत होते. दरम्यान, तुम्हाला प्रश्न पडला असेल की इरिटेबल बोवेल सिंड्रोम म्हणजे




काय आणि हा विकार कसा होतो. याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात. इरिटेबल बोवेल सिंड्रोम म्हणजे हा एक आतड्यांसंबंधीचा विकार आहे. या विकारात मेंदूतील न्यूरोट्रान्समीटरमुळे आतड्याच्या संवेदनशीलतेमध्ये बदल होतात. या आजाराची सुरुवात तरुणाईतच होते. वयाच्या ४५ नंतर या आजाराची सुरुवात होताना क्वचितच आढळते. अर्थात, प्रौढ आणि वृद्धांनासुद्धा आयबीएसचा त्रास होत राहतो. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये या आजाराची लागण अधिक होते. आयबीएसच्या रुग्णांचे दोन प्रमुख प्रकार आहेत. एकामध्ये रुग्णांना पोटदुखीच्या त्रासाबरोबरच वारंवार जुलाब होतात. नियमितपणे कॉफी प्यायल्याने महिलांना आयबीएस टाळण्यास कशी मदत होते?इरिटेबल बॉवेल सिंड्रोम हा विकार असलेल्या महिलांना कॉफीची शिफारस केली आहे. नियमितपणे कॉफी प्यायल्याने महिलांना आयबीएस टाळण्यास मदत होण्याची शक्यता आहे. नवीन अभ्यासानुसार कॉफी पिणाऱ्यांमध्ये हा विकार होण्याची शक्यता १६ टक्के कमी असते. ज्यांना अतिसाराचा वारंवार त्रास होतो, त्यांच्यासाठी याची शिफारस केलेली नाही.कोणते पदार्थ खाणे टाळावे?ब्रेड, चिप्स आणि कुकीज, अल्कोहोल यांसारखे जे पदार्थ आपल्याला पचत नाही, तो टाळणेच इष्ट असते; हा उपचारातील सर्वांत महत्त्वाचा भाग असतो.पुरुषांपेक्षा महिलांना आयबीएसचा जास्त त्रास का होतो?गर्भावस्थेदरम्यान स्त्रियांच्या शरीरातले हार्मोन्स बदलत असतात, त्यामुळे महिलांना याचा जास्त त्रास होतो. स्त्रियांना मासिक पाळी येण्यापूर्वी किंवा पाळी चालू असताना हे त्रास वाढतात.

# डिजिटल पालकत्व- मुलांसमोर आपण कोणत्या सवयींचा आदर्श ठेवतोय?

डिजिटल पालकत्व सोपं नाहीए. आपण आपल्या वर्तणुकीतून मुलांसमोर कोणता आदर्श ठेवतो, ते महत्त्वाचं असतं. कारण मुलांसाठी आई- वडील आदर्श असतात म्हणूनच पालकांची डिजिटल वर्तणूक महत्त्वाची ठरते! अनेक पालकांना सकाळी उठल्या-उठल्या आधी मोबाईल पाहायची किंवा सतत दर पाच- दहा मिनिटांनी मोबाईल पाहण्याची सवय असते. जरा रेंज मिळत नसेल; तर काही पालक अवस्थ होतात. काही पालक सतत सेल्फीज काढत इन्स्टावर अपलोड करत असतात. काही पालक तिथे मिळणाऱ्या लाइक्सना आणि कमेंट्सना पाहून खूश होत असतात. त्यांच्या या आनंदी होण्यात व्यत्यय आला; तर ते चिडतात. काही पालक ऑफिसमधनं घरी आले की, मुलांशी बोलण्याआधी फोनमध्ये डोकं घालतात. काही पालक मुलांना जेवू घालताना त्यांना टीव्ही लावून देतात आणि स्वतः व्हॉट्सपमध्ये किंवा सोशल मीडियात डोकं घालून बसतात काही पालक मुलांना झोपवताना एका हातानं थोपटतात; तर दुसऱ्या हातानं मेसेजेस चेक करत असतात. काही पालक ट्रीपला गेल्यावर प्रवासात बहुतेक सगळा वेळ स्वतःच्या स्मार्टफोनवर काहीबाही बघत असतात. काही पालक सतत कुणाशी तरी गॉसिपिंग करत असतात तर काही पालक ऑनलाईन जगात कुणाशीतरी वाद घालून त्या व्यक्तीला आपण कसं अपमानित केलं, हे मोठ्या अभिमानाने मुलांसमोर सांगत असतात यादी अजूनही बरीच मोठी होईल मुलं हे सारं पाहात असतात. त्यांना जे-जे आणि जितकं समजतंय; त्यानुसार ती त्या सवयी उचलत असतात. प्रत्येक मुलासाठी त्याचे आईबाबा आदर्श असतात. अशा वेळी ते जे करतात; ते आपण केलं तर त्यात काही चुकीचं नाहीये हा विचार दृढ व्हायला वेळ लागत नाही. मात्र हे सगळं होत असताना मुलांचं वय अगदीच नाजूक असतं. एक उदाहरण बघूया. व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये झालेला वाद आई किंवा बाबा मोठ्या अभिमानाने एकमेकांना किंवा घरातल्या इतर मोठ्या सदस्यांना आपण त्या वादात कसे जिंकलो, समोरच्याचे कसे काही ऐकून घेतले नाही, उलट त्यालाच कशा चार गोष्टी सुनावल्या वगैरे सांगत असतात. हे सांगताना ते अतिशय उत्तेजित असतात. काहीवेळा त्यांची शारीर भाषा आक्रमक झालेली असते. एखाद दोन शिव्याही हासडल्या जातात. बाकीचे जे झालं तर कसं बेस्ट झालं असं म्हणत घडलेल्या प्रसंगाचं कौतुक करत असतात, टाळ्या पिटत असतात.मोठ्यांच्या जगात हे सगळं सुरु असताना घरातली मुलं हे पाहात असतात, ऐकत असतात. आईबाबा किंवा घरातले इतर मोठे जे वागतायेत तसं वागायला काहीच हरकत नसते असं मुलं यातून घेऊ शकतात. किंवा आपला मुद्दा बरोबर आहे चूक हे पाहण्याची गरज नाही, समोरच्याच ऐकून घ्यायचं नसतं असाही संदेश मुलं यातून घेऊ शकतात आणि त्यांच्या वर्तनात आणू शकतात. ऑनलाईन जगातल्या कुठल्यातरी ग्रुपमध्ये झालेल्या फुटकळ वादातून आपण मुलांपर्यंत आपल्याही नकळत असहिष्णुता पोहोचवत असतो याचा आपण कधी विचार करतो का?डिजिटल पालकत्व सोपं नाहीये. आपल्या हातांतलं तंत्रज्ञान हा आपला शत्रू नाहीये, आपलं त्याच्याशी भांडण नाहीये. पण त्याचबरोबर आपल्या मुलांना आणि आपल्यालाही इंटरनेट/ सोशल मिडिया/ गेमिंग यांचं व्यसन लागू नये, त्यांचं डिजिटल वर्तन चांगलं असलं पाहिजे असं वाटत असेल; तर आपलं जगणं इंटरेस्टिंग कसं होईल हे पाहायला हवं. मुलांनी स्मार्टफोनमध्ये अडकू नये असं वाटत असेल; तर मुलांना आपल्याशी सहज कनेक्ट कसं होता येईल हे पालकांनी बघायला हवं म्हणजेच मुलांशी बोलायला




हवं आणि हा संवाद म्हणजे मुलांचं बौद्धिक घेणं नाही. तर सहज मैत्रिपूर्ण संवाद. आपले आईबाबा, आजीआजोबा मोबाईल वापरतात पण ते मोबाइलशिवायही अनेक गोष्टी करतात हे मुलांना दिसलं पाहिजे. ते पुस्तकं वाचतात, व्यायाम करतात, गाणी ऐकतात, बागकाम करतात, फिरायला जातात, मित्रमैत्रिणींशी प्रत्यक्ष भेटतात, गप्पा मारतात हे सगळं मुलांना दिसणं आज गरजेचं आहे.बहुतेक घरांमध्ये एकत्र वेळ हा अभ्यास, मॉलमध्ये फिरणं किंवा आरडाओरडा यांसाठीच असतो. उगाचच गप्पा, कुठलाही अजेंडा न ठेवता मारलेल्या गप्पा, केलेली भटकंती या गोष्टी मुलांशी कनेक्ट होण्यासाठी सगळ्यात जास्त गरजेच्या असतात. ऑफिसमधून आल्यावर दमलोय म्हणून फोनमध्ये डोकं खुपसण्यापेक्षा मुलांशी बोला. त्यांचा दिवस कसा गेला ते विचारा. टेन्शन काही फक्त पालकांच्या आयुष्यात नाहीये, ते मुलांनाही येतं. एकमेकांशी बोलून ते कमी होतं. गेमिंग करून टेन्शन जातं हा निवळ भ्रम आहे. गेमिंगनं ते वाढतं. एकत्र जेवा. जेवताना शक्यतो मोबाईल पाहात बसू नका. आठवड्यातनं एक दिवस ‘नो स्क्रीन डे’ ठेवा किंवा कमीत कमी फोन वापरायचा असं ठरवा. त्यांच्याशी खेळायला, बोलायला, दिवस कसा गेला हे विचारायला जर आईबाबांनाच वेळ नसेल, कंटाळा येत असेल; तर मुलं नेटमध्ये शिरणार हे गृहीत धरा. मुलांना दोष देण्याआधी आपण काय करतोय हे पालकांनी बघणं गरजेचं आहे.

# वेदनांपासून आराम मिळवण्यासाठी ‘मेफ्टल’चे सेवन करीत असाल, तर सावधान! औषधाबाबत सरकारने दिला गंभीर इशारा

इंडियन फार्माकोपिया कमिशन (खझउ)ने सामान्य वेदनांपासून आराम मिळवून देणाऱ्या ‘मेफ्टल’ या औषधाबाबत एक गंभीर इशारा दिला आहे. आपल्यापैकी अनेक जण डॉक्टरांना न विचारता, वेदनांपासून आराम मिळवण्यासाठी काही औषधे घेतात. त्यामध्ये मेफ्टल नॉन-स्टेरॉइडल अँटी-इन्फ्लेमेटरी ड्रग (छड-खऊ) हे औषध मोठ्या प्रमाणात घेतले जाते. परंतु, आता इथून पुढे या औषधाचा डोस घेण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे खूप गरजेचे आहे. कारण- इंडियन फार्माकोपिया कमिशन (खझउ)ने सामान्य वेदनांपासून आराम मिळवून देणाऱ्या या औषधांबाबत एक गंभीर इशारा दिला आहे; ज्यामध्ये म्हटले आहे की, या औषधामधील घटक मेफेनॅमिक ॲसिड, ड्रेस सिंड्रोमसारख्या गंभीर ॲलर्जीक प्रतिक्रियांना चालना देतात; ज्याचा तुमच्या शरीरातील अंतर्गत अवयवांवर परिणाम होतो.हा इशारा देताना आयपीसीने म्हटले आहे, आरोग्य सेवा व्यावसायिक, रुग्ण आणि ग्राहकांना सल्ला देण्यात येत आहे की, वरील संशयित औषधाच्या वापराशी संबंधित रुग्णांवर होणाऱ्या दुष्परिणामांवर बारकाईने लक्ष ठेवा. परंतु, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार या औषधाचे गंभीर साइड इफेक्ट्स अत्यंत दुर्मीळ आहेत; तसेच ते आधीपासून ज्ञात आहेत. मात्र, डॉक्टरांनी असा इशाराही दिला आहे की, हे औषध लिहून देताना रुग्णाचं मूल्यांकन करणं गरजेचं आहे. कारण- या औषधाची प्रतिक्रिया वैयक्तिकदृष्ट्या रुग्णावर अवलंबून असते. तसेच खरी समस्या औषधाच्या अनियंत्रित वापरासंबंधी आहे. खरं तर, हे एक प्रिस्क्रिप्शन औषध आहे; परंतु भारतामध्ये मासिक पाळीच्या वेदना, डोकेदुखी, स्नायू व सांधेदुखी यांसह विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर मेफेनॅमिक ॲसिडचा वापर केला जातो, तसेच मुलांना ताप आल्यावरही याचा वापर केला जातो. साइड इफेक्ट ड्रेस सिंड्रोम म्हणजे काय?ड्रेस सिंड्रोम (ड्रेस सिंड्रोम ही विशिष्ट औषधांमुळे होणारी गंभीर ॲलर्जी आहे.) ही एक गंभीर ॲलर्जिक प्रतिक्रिया आहे; जी जवळपास १० टक्के व्यक्तींना प्रभावित करते आणि ती खूप घातक व विशिष्ट औषधांमुळे होते. या लक्षणांमध्ये त्वचेवर पुरळ, ताप व लिम्फॅडेनोपॅथी यांचा समावेश होतो; जी औषध घेतल्यानंतर दोन ते आठ आठवड्यांदरम्यान उदभवू शकतात.डॉ. सुरभी सिद्धार्थ (कन्सल्टंट ऑब्स्टेट्रिशियन ॲण्ड गायनॅकॉलॉजिस्ट, मदरहूड हॉस्पिटल, मुंबई) यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितलं, आयपीसीने नुकत्याच मेफेनॅमिक ॲसिड औषधाच्या दिलेल्या इशाऱ्यानंतर हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, या औषधाशी संबंधित ड्रेस सिंड्रोममुळे त्वचेवर पुरळ, उच्च ताप यांसारख्या समस्या उदभवू शकतात. आयपीसीने रुग्णाच्या सुरक्षेसाठी औषधांच्या वापराआधी निरीक्षण आणि अहवाल देण्यावर भर दिला आहे. मेफेनॅमिक ॲसिड वापरत असल्यास संभाव्य पर्यायांसाठी डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्या.गॅस्ट्रोइंटेस्टायनल समस्यांकडे लक्ष द्या - डॉ. गौतम भन्साळी (सल्लागार फिजिशियन, बॉम्बे हॉस्पिटल) सांगतात, मेफ्टलसारख्या औषधांचा दीर्घकाळ वापर केल्याने पोटात अल्सर, रक्तस्राव आणि संबंधित गुंतागुंत होण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे गॅस्ट्रोइंटेस्टायनल समस्या असलेल्या लोकांनी खबरदारी घेतली पाहिजे. त्याव्यतिरिक्त मेफ्टल हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी समस्यांशी संबंधित आहे. वरील धोके लक्षात घेता, आरोग्य सेवा व्यावसायिक मेफ्टलच्या जबाबदार आणि माहितीपूर्ण वापरावर जोर देतात. मेफ्टलचा उपचार सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू ठेवण्यापूर्वी रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. विशेषत: अशा रुग्णांनी; ज्यांना गॅस्ट्रोइंटेस्टायनल, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी किंवा मूत्रपिंडाच्या समस्यांचा त्रास आधीपासून सुरू आहे.



## आ.शेखर निकम यांच्या प्रयत्नाने हिवाळी अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांमध्ये चिपळुण संगमेश्वर मतदार संघासाठी ५४ कोटीचा निधी मंजूर



नागपूर: जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या रस्त्यांची झालेली अत्यंत दयनीय अवस्था पाहता या रस्त्यांची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने व दळणवळणासाठी ग्रामीण भागातील नागरिकांची होणारी ओढाताण संपविण्यासाठी आमदारांनी सबब बाब महायुती सरकारच्या लक्षात आणून दिली. आमदारांच्या या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या रस्त्यांसाठी शासनाने निधी उपलबद्ध करून दिला. या अनुषंगाने आमदार शेखर निकम यांनी चिपळूण व संगमेश्वर तालुक्यातील ग्रामीण मार्गांसाठी १२ कोटी ८१ लाख निधी मंजूर केला. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असणारे रस्ते, पुल, वॉल यांसाठी चिपळूण व संगमेश्वर तालुक्यांसाठी ४१ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मतदार संघासाठी दिलेल्या या निधीबद्दल आमदार शेखर निकम यांनी महायुती सरकारचे नेते मा. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री उदयजी सामंत यांचे आभार मानले. सोबतच कोकणचे पहिले सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. रविंद्रजी चव्हाण यांचे देखील विशेष आभार मानले.

# वडिलांच्या स्मरणार्थ चैत्यभूमी दादर येथे मोफत बुद्ध आणि धम्म ग्रंथ वाटप

बुलढाणा : जिल्ह्यातील मलकापूर येथील ज्येष्ठ समाजसेवक भारतीय बौद्धमहा सभाचे शहर अध्य क्ष आनंद काशिनाथ तायडे यांचे एप्रिल महिन्यात दीर्घ आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात त्यांच्या मोठ्या मुलाने डॉ. अमरकुमार आनंद तायडे यांनी वडिलांनी दिलेला सामाजिक आणि वैचारिक वारसा पुढे सुरू ठेवला आहे. त्यांनी ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादरमधील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी येत असता आणि प्रत्येक जण एक तरी पुस्तक आपल्या घरी घेऊन जात असतो. त्यामुळे डॉ अमरकुमार तायडे यांनी मोफत बुद्ध आणि त्यांच्या धम्म ग्रंथ सकाळी १० वाजे पासून तर दुपारी ३ वाजेपर्यंत वाटप केले. तसेच दुपारी आरोग्य शिबीर व संध्याकाळी ८ वाजेपासून तर १० वाजेपर्यंत भोजन






वाटप असे सामाजिक उपक्रम राबविले तर बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाटप उपक्रमची अनेकानी स्तुती केली. त्यावेळी संपूर्ण नियोजन द पीपल्स बहुउद्देशीय संस्था मुंबई, यांचे सभासद राहुल कांबळे, करण झनके, ज्योती झेंडे, प्रमोद तायडे, निलेश अहिरे, सिद्धांत गायकवाड, निशांत ठाकरे, आदर्श सुरडकर, सुशील वाहुले यांनी बघितले.

# न. मुं. महानगरपालिका शहर अभियंता विभाग हे एक लिपिक चालवताना बघायला भेटते हे दुर्दैव आहे, त्यावर चौकशी व्हावी ! - अरुण बिराजदार

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबई महानगर पालिकेच्या कोणत्याही निविदा मध्ये सर्व लिपिकाचा समाविष्ट करण्यात येत त्या लिपिकाची व्याख्या म्हणजे निविदे मध्ये शासन निर्णयाची अट वगळून हे महोदय स्वतःची बुद्धी वापरून काहीही बनावट तयार करून त्यांच्या हिशोबाने ते निविदे मध्ये अट टाकतात. जसे की निविदे क्र २७१(०६),३१२,२७१(०५) उदाहरण अर्थ या तीन निविदे मध्ये अशी अट टाकण्यात आली आहे जे अट मुळात १.५ कोटी च्यावर वर असलेल्या निविदे मध्ये असावी असा स्पस्ट शासन निर्णय आहे परंतु लिपिक म्हणजे मुख्य शहर अभियंता ना तर त्यांना त्या शासन निर्णयाशी काही घेणे देणे नाही ते यात मागतात स्वतःच्या मालकीची जे गउइ,ञ्रचझएठ, ढठ–छड्खढ चखदएठ,ठचउ झङ–छ्ढ, –ड्झक–ड्ढ झङ–छ्ढ, हे सगळे मागत असताना त्यांना १०० वेळा शासन निर्णय वाचून दाखवले पण त्यांना काहीही भीती नाही की कुठे तरी आम्ही दिवसा मा आयुक्त व प्रशासन आणि नविमुंबईकरं यांच्या बरोबर विश्वास घात करून महापालिकेच्या तिजोरीतून पैसे चोरतोय व बाकी लोकांना पण चोरू देतोय आता या मध्ये शहर अभियंता विभाग चालवणे म्हणजे काय नवी मुंबई महानगर पालिकेच्या कोणत्याही बांधकाम संदर्भातील निविदे निघाले की त्यांना शहर अभियंता यांची मान्यता लागते पण निविदे च्या आधी अभ्यास लागतो ते शहर अभियंता यांना त्याबाबत पुरेसे माहीत नसतं त्यामुळे हे लिपिक जे बोलतात ते फक्त तोंड हलवतात आणि कोणत्याही निविदे वर काय अट आहे नाही ते योग्य आहे नाही हे सगळं विचारून त्याबाबत शहानिशा करून ते काम करत नाही म्हणजे ते नावासाठी त्या पदावर विराजमान आहेत जेव्हा शहर अभियंता यांना विचारण्यात आले शासन निर्णय झालेला असताना तुम्ही कोणत्या अधिकाराने ते निर्णय बदलून महापालिकेचे स्वतंत्र तोंडी किंवा मनमानी निर्णय त्यात टाकून पालिकेचा नुकसान करता त्यामुळे केंद्र सरकारच्या पारदर्शक कामकाजाला टोपली दाखवता त्यावर ते मौन धारण करतात. म्हणजे काही लिपिकांच्या आदेशानुसार शहर अभियंता चालतात असा सिद्ध होतो कारण शहर अभियंता यांना अनेक ठेकेदार यांनी तक्रारी करून सुद्धा त्यावर कार्यवाही नाही केली म्हणजे कायदे न्याय पद्धत महापालिके मध्ये काही आहे की नाही असा दिसून येतो.





मुळात आपण जे लिपिकाच्या बदल थोडक्यात बोलतोय ते सर्व कार्यकारी अभियंता यांचे लिपिक आहेत ज्यांना अनेक वर्षांपासून त्याच पदावर बसवून सगळे मजा घेत असताना दिसून येतात सगळे म्हणजे नकी कोण काही लोकप्रतिनिधी, काही ठेकेदार, काही त्यांच्या मार्जितले लोक जे त्यांना हवे तेवढे रक्कम देऊ करतात यात मुख्य स्वरूपात नुकसान कोनाकोणाचे होतात ते बघूया नुकसान म्हणजे १) सर्वप्रथम नवी मुंबई चे जनतेचा जे कर भरलेल्या पैस्यांनी हे कामे करतात त्यात पारदर्शक कारभार नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात २) महापालिकेच्या अधिकारी कारण,, सगळे ठेके हे लिपिक कार्यकारी अभियंता संगनमताने त्यांच्या मार्जितले लोकांना देतात त्यामुळे स्पर्धा होत नाही जेणेकरून नागरिकांच्या पैसेही २ हाताने लुटले जातात ३)राज्य सरकारचा जे ऋठ काडून सुद्धा हे अधिकारी ते जुमानत नाही त्यामुळे यात त्यांचा ही नुकसान आहे सगळ्यात मोठे नुकसान म्हणजे नवी मुंबई च्या लाखो नवीमुंबईकर यांच्या विश्वासघाताचा जे हे अधिकारी त्यांनी दिलेल्या पगारातून काम ही करतात व मोठ्या प्रमाणात त्यांचे पैसे ही चोरतात. तसेच एक विशेष कामात तर घणसोली मधल्या एका महिला लोकप्रतिनिधी यांनी चक्क पत्रव्यवहार केलेलं दिसून आले आहे त्यामध्ये जो विषय आहे तो लोकहीताच नसून त्यांच्या हिताचे आहे परंतु असे कृत्य फक्त त्यांनीच केले असे नाही ९९ टके लोकप्रतिनिधी करतात त्यांच्या ध्येय साधण्यासाठी आणि अधिकारी यांच्या समवेत मिळून काही ठेकेदार यांनी पारदर्शक प्रमाणे काम भरले असेल तर त्यांना चुकीच्या पध्दतीने बाद करणे व त्यांना धमकवणे हे सरास या नवी मुंबई महानगर पालिकेच्या कामकाजात चालत. त्यामुळे शहर अभियंता विभागाकडून जे कोणते निविदा निघाले आहेत कमीत कमी २ वर्षांमध्ये आणि विशेष करून हे या सर्व लिपिकाचा हस्तक्षेप किंवा कार्यपद्धती मध्ये त्याची संपूर्ण चौकशी पारदर्शक प्रमाणे मा आयुक्तांनी केली पाहिजे अशी मागणी समाजसेवक अरुण बिराजदार यांनी केली.

# विकसित भारत संकल्प यात्रा लातूर शहरात दाखल, ८ दिवस असणार शहरात

लातूर दि.९ ( जिमाका ) केंद्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध योजना सर्वसामान्यांना कळाव्यात आणि या लाभापासून वंचित राहिलेल्या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच लाभांपासून वंचित राहिलेल्या घटकांना लाभ मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते लातूर शहरातील लक्ष्मी धाम सोसायटी परिसरात करण्यात आला.यावेळी सहआयुक्त रामदास कोकरे,माजी नगरसेविका रागिनी यादव,स्वाती घोरपडे,श्वेता लोंढे,शोभा पाटील व वायचळकर मॅडम यांची उपस्थिती होती.






ही यात्रा दि.९ ते १६ डिसेंबर या कालावधीत शहाराच्या विविध भागात चित्ररथाच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती देणार आहे.या सोबतच वंचित लाभार्थ्यांची नोंदणी केली जाणार आहे.

या विकसित भारत संकल्प यात्रेत दीनदयाळ अंत्योदय योजना,प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जनआरोग्य योजना,उज्वला योजना व आधार कार्ड संदर्भात माहिती दिली जाणार आहे.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लाईव्ह कार्यक्रम एलईडी व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांना दाखवण्यात आला.परिसरातील जवळपास ५०० नागरिक यावेळी उपस्थित होते. शनिवारी शहरातील लक्ष्मीधाम सोसायटीतला कार्यक्रम संपला. त्यानंतर आर्वी येथे ही यात्रा पोहोचेल. शहरात खालील ठिकाणी होणार कार्यक्रम रविवार दि.१० रोजी सकाळी १० ते १ या काळात सोनानगर येथे यात्रा पोहोचणार आहे. दुपारी ३ ते ६ या वेळेत सूळनगर येथे यात्रा पोहोचणार आहे. सोमवार दि.११ रोजी सकाळी १०ते १या कालावधीत बसवंतपूर तर दुपारी ३ ते ६ या काळात सोहेल नगर येथे यात्रा पोहोचेल.दि.१२ रोजी सकाळी १० ते १सावेवाडी व दुपारी ३ ते ६ वरवटी (हडको )येथे यात्रा पोहोचणार आहे. दि.१३ रोजी सकाळी १० ते १ अन्सार कॉलनी येथे व दुपारी ३ ते ६ गंजगोलाईत विकसित भारत संकल्प यात्रा पोहोचेल.दि.१४ रोजी विवेकानंद चौक येथे सकाळी १० ते १ व मंठाळे नगर मध्ये दुपारी ३ ते ६ यात्रा पोहोचणार आहे. दि.१५ रोजी यात्रा भीमनगर येथे सकाळी १० ते १ व दुपारी ३ ते ६ बुद्ध गार्डन येथे यात्रा जाणार आहे.दि.१६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १ विकसित भारत संकल्प यात्रेतील एल इ डी व्हॅन आंबेडकर पार्क येथे जाणार आहे.

त्या– त्या भागातील नागरिकांनी विकसित भारत संकल्प यात्रेत सहभागी व्हावे.केंद्र शासनाच्या योजनांपासून वंचित राहिलेल्या नागरिकांनी नोंदणी करावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.


# साखरेचे पाच दाणे: आत्मशोधाच्या प्रवासाची रंजक कथा

लातूर : एजाज शेख महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयद्वारा आयोजित ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२३–२४ ची प्राथमिक फेरीत लातूर केंद्रावर येथील मार्केट यार्डातील स्व. दगडोजीराव देशमुख स्मृति सभागृहात दि. ९ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता कलारंग लातूरच्या वतीने सुरेश शांताराम पवार लिखीत व कल्याण वाघमारे दिग्दर्शित 'साखरेचे पाच दाणे' हे दोन अंकी नाटक सादर झाले. नाटकाच्या संहितेनूसार दिग्दर्शकाने कल्पकतेने केलेली मांडणी नाट्यरसिकांना भावली. त्यामुळे नाट्यरसिकांची या नाटकाला उत्स्फुर्त अशी दाद दिली.

'मी'च्या आत्मपरिचयाच्या, आशयांच्या आणि प्रेरणांच्या पल्ल्यांचं सुंदर वर्णन केलेलं आहे, ज्यामुळे आपल्याला आपल्या आत्मविश्वासाच्या, क्षमतेच्या, आणि स्वप्रेमाच्या पल्ल्यांच्या आणि व्यक्तिमत्वाच्या प्रमोटिंगाची प्रेरणा मिळेल. या माध्यमातून, आपण आपल्याला स्वत:च्या प्रेरणांच्या, यशांच्या, आणि स्व योग्यतेच्या पल्ल्यांच्या स्वयंप्रस्तावनेत प्रवेश करण्याची प्रेरणा मिळते. मी कोण आहे, हे परिभाषित करणारे अनुभव, आकांक्षांसोबत जीवन जगत असताना आपल्याला कोणीतरी खेळवतोय. 'तो'एक कोणीतरी आहे. जीवन हा आत्मशोधाचा प्रवास आहे. त्यात स्वत:ला ओळखले की माणूस स्थिरावतो, असे या 'साखरेचे पाच दाणे' या नाटकाचे कथासार.नाटक हे लेखकाचे असते. परंतू, या नाटकाला कल्पक दिग्दर्शनाची जोड मिळाली ही ते नाटक लेखकाचे न राहाता चक्क दिग्दर्शकाचे होऊन जाते. असाच काहीसा प्रकार 'साखरेचे पाच दाणे' या नाटकाचे दिग्दर्शक कल्याण वाघमारे यांच्या बाबतीत झाला. नाटकाला कल्पकतेने उभं करण्यात वाघमारे यांनी कसलीच कसर सोडली नाही. रिकाम्या फोटो फ्रे मचा केलेला वापर अफातून होता. एकंदर नाटकात वाघमारे यांच्या दिग्दर्शनाने छाप सोडली होती. अरुण बारसकर यांची राजकुमारची मध्यवर्ती भूमिका त्यांनी खुप ताकदीने उभी केली. संवाद, रंगमंचीय हालचाली, हावभाव या सर्वच गोष्टी उत्तम होत्या. सुधनवा पत्की यांचा पुंडलिक त्यांनी ब–यापैकी सादर केला.

## लातूर जिल्ह्यातील १५ खाजगी 'डीएड' महाविद्यालये बंद

लातूर : एजाज शेख जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांसोबतच खाजगी अनुदानीत शाळांतील शिक्षकांची पदे भरली जात नाहीत. त्यातच अतिरिक्त शिक्षकांची संख्या खुप मोठी आहे. गेल्या १० वर्षांपासून शिक्षकांची भरती झालेली नाही. परिणामी भावी शिक्षकांनी पर्यायी रोजगार स्वीकारला आहे. ही परिस्थिती लक्षात घेता शेकडो युवक–युवतींनी शिक्षक होण्याकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे प्रवेशाअभावी लातूर जिल्ह्यातील १४ खाजगी तर १ शासकीय 'डीएड' महाविद्यालये बंद झाली आहेत तर चार खाजगीसह उदगीरचे एक शासकीय 'डीएड' महाविद्यालय कार्यरत असल्याची वस्तूस्थिती समोर आली आहे.शिक्षणाची पंढरी, अशी ओळख निर्माण झालेल्या लातूर जिल्ह्यात शिक्षक घडविणा–या संस्थाही मोठ्या प्रमाणात होत्या. लातूर शहरात ५, औसा–१, निलंगा–२, रेणापूर–२, शिरुर ताजबंद–१, अहमदपूर–३, जळकोट–२ तर उदगीर येथे २ असे एकुण १८ खाजगी 'डीएड' महाविद्यालये तर मुरुड व उदगीर येथे प्रत्येकी एक असे दोन शासकीय 'डीएड' महाविद्यालये होती. जिल्ह्यात १८ खाजगी तर २ शासकीय असे एकुण २० 'डीएड' महाविद्यालये होती. त्यापैकी १४ खाजगी व मुरुडचे एक शासकीय, असे एकुण १५ 'डीएड' महाविद्यालये बंद पडली आहेत. चार खाजगी व उदगीरचे एक शासकीय असे ५ 'डीएड' महाविद्यालये सध्या कार्यरत आहेत. साधारणत: १५–१६ वर्षांपुर्वी 'डीएड'कडे सर्वांचाच कल होता. त्याकाळी 'डीएड' होताच शिक्षकाची नोकरी पटकण मिळत असे. परंतू काळ बदलत गेला आणि 'डीएड'चे महत्वही कमी म्हणण्यापेक्षा आता संपलेच, असे दिसून येत आहे. अधी १० वी त्यानंतर १२ मध्ये ९०–९५ टक्के जरी गुण मिळाले तरीदेखील विद्यार्थी विशेषत: मुली 'डीएड'साठी ईच्छूक असायच्या. त्यावेळी प्रवेशाची गुणवत्ता यादी ८५ टक्क्यांवरच असायची. २०१२–२०१३ नंतर राज्यात शिक्षकभरतीच झाली नसल्याने नोकरीच्या प्रतिक्षेत असलेल्या अनेक



युवक–युवतींचे वय निघून गेले. विनाअनुदानीत शाळांवर १२–१५ वर्षे बिनपगारी काम करणारे अनेकजण आज सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आले, तरीही त्यांना पगार सुरु झाला नाही. आता शिक्षकभरतीची घोषणा व सुरुवात होऊन सहा महिने लोटले, तरीदेखील प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. शिक्षण पुर्ण करुनही नोकरी मिळत नसल्याने भावी शिक्षकांनी पर्यायी शिक्षणाचा मार्ग अवलंबल्यानेच जिल्ह्यातील १५ 'डीएड' महाविद्यालयांना टाळे लागले आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE